2019-2020
C-III-(1)
05

VOL. 6 | ISSUE 2| MARCH- APRIL 2020

Impact Factor: 4.197 (IIJIF) *

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

(BOOK 2)

*Chief Editor :*

**Dr Kalyan Gangarde,**

Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)

*Executive Editor*

**Dr Grishma Khobragade,**

Asst. Prof., Birla College, Kalyan (W)

*Co- editors*

**Dr. Sadhana Agrawal,**

Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India

**Pandurang Barkale,**

Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai

**Bharat Gugane,**

Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra

**Dr. Dashrath Kamble,**

Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra

**Dr. Sachin Bhumbe,**

Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

Mahatma Gandhi Education and Welfare Society's

**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)**

www.mgsociety.in +91 8329000732 Email: chcskalyan@gmail.com

**Full Journal Title:** Chronicle of Humanities & Cultural Studies(CHCS)
**Print ISSN:** 2454-5503
**UGC Approved Journal No.** 63716
**Impact Factor:** 4.197 (IIJIF)
**Frequency:** Bimonthly / **Language:** Multi language / **Journal Country/Territory:** India
**Publisher:** Centre for Humanities & cultural Studies, A-102, Sanghavi Regency, Sahyadrinagar, Kalyan (W) (MS).
**Subject Categories:** Humanities & Cultural Studies

*Chief Editor :*
**Dr Kalyan Gangarde,** Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)
*Executive Editor*
**Dr Grishma Khobragade,** Asst. Prof., Birla College, Kalyan (W)
*Co- editors*
**Dr. Sadhana Agrawal,** Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India
**Pandurang Barkale,** Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai
**Bharat Gugane,** Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra
**Dr. Dashrath Kamble,** Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra
**Dr. Sachin Bhumbe,** Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

## EDITORIAL ADVISORY BOARD

**Aju Mukhopadhyay,**
a poet, author and critic, 8 Cheir Lodi Street, Pondicherry, India.
**Dr R.T. Bedre,**
Principal RSPMS' SPP College, Sirsala, Dist. Beed (MS)
**Dr (Mrs.) Smita R. Nagori,**
Head,PG Department of English, M.U.College Udgir, Dist. Latur, Maharashtra, India. Email: smita.lakhotiya@gmail.com
**Dr Arvind Nawale**
Head, Department of English, Shivaji Mahavidyalaya Udgir, Dist. Latur (Member, BoS in English, Former Member of the Senate, Faculty of Arts, SRTM University, Nanded
**Dr Rajiv Kumar,**
Associate Professor, Dept. of English, S.K.M University, Dumka, Jharkhand
**Dr Kailash Nimbalkar,**
Principal, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra, India. Email: nimbalkar_8@rediffmail.com.
**Tsai-ching Yeh**
Assistant professor, Department of English, National Taipei University of Technology. (Taivan)
**Dr B. N. Gaikwad,**
Vice Principal, N.G. Acharya and D.K. Marathe College of Arts, Commerce and Science , Chembur (East , Mumbai-400071
**Dr Simon Philip,**
Assistant professor, Department of Social Work, Voorhees College, Vellore
**Dr Binu Anitha Josheph**
Assistant professor, Department of English, Voorhees College, Vellore
**Dr Chandrashekhar Kanase**
Head, Department of Dramatics, SPP College, Sirsala, Dist Beed (MS)

## EDITORIAL BOARD

**Dr Mahendra Shinde,** Associate Professor and Head, Department of English, N.M. Sailu, Dist. Parbhani, Maharashtra, India.
**Dr Ramkishan Bhise,** Assistant Professor, SIES Graduate School of Technology, Nerul, Navi Mumbai
**Dr Asish Gupta,** Asst. Professor, J. H. Govt. P. G. College, Betul MP.

| Subscription Rates | | |
|---|---|---|
| | Annual membership (Individual) | Rs. 1,800 (150 $ for foreigners) ( Six Issues ) |
| | Bi-annual Membership | Rs. 3,500 (250 $ for foreigners) |
| | Institutional annual membership | Rs. 2,200 |
| | Institutional Bi-annual membership | Rs. 4,200 |

*Those interested in making online transactions, the following details may be of use:*

| Bank Name | Account Name | Account Number | IFSC code |
|---|---|---|---|
| Canara Bank **(Branch: New Marine Lines, Mumbai)** | Centre for Humanities & Cultural Studies | 1389101071921 | CNRB0001389 |

*DISCLAIMER: Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references and biographies/references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.*

*

## FROM THE EDITOR'S DESK .......

**WE** are delighted to present the Vol.6- Issue 2 (Book 2) of *Chronicle of Humanities & Cultural Studies* (CHCS) with valuable contributions from reknowned scholars of India. The journal is run by *'Centre for Humanities & Cultural Studies', Kalyan.* It is a brilliant off shoot of the Mahatma Gandhi Education & Welfare Society, Narwadi, Dist. Parbhani. It has been established with the mission to contribute to the education and welfare of the society to empower individuals for the better future.

We are confident that the issue will be useful for readers, critics and researchers. We are grateful to all our contributors for their responses.

We gratefully acknowledge the guidance and help received from various persons during the completion of this issue. We thank all the members of our advisory board and editorial board.

CHCS is a refereed journal, published bi monthly (Six issues in a year). In order to make *CHCS* self-sustaining, we need your support and patronage. As our well-wisher/friend/patron we urge you to enroll new members for the journal. In turn, we assure you that we will not compromise on quality in matters of content and production

Our next Issue will be published in June 2020. We hope you can make it successful with your valuable contributions.

We hope you enjoy this month's reading and as ever, if you have any questions or comments, please contact us at: chcskalyan@gmail.com .

# CONTENTS


1. Re-defining Identity in Chitralekha Banerjee Divakaruni's *Oleander Girl* — 5
   **Ms. Nomita Suresh Bilaye**
2. A Journey from Darkness to Light in Arvind Adiga's *The White Tiger* — 10
   **Dr Gayatri**
3. Social and Cultural Stratifications and the National Politics: A critical Study of Aravind Adiga's*The White Tiger* — 12
   **Amit Soni & Dr. Ravi Kant Dwivedi**
4. Minimum Support Price Policy in India — 17
   **Dr. Pradeep S. Jadhav**
5. English Study Material At Advance Level : A Time Saving Tool for English Teaching – Learning Process — 21
   **Ms Syeda Nusrath Fatima**
6. Women in Shakespeare's Tragic Plays — 25
   **Ila Pandey**
7. Family and Social Relationships as Sites of Discourse: An Analysis of the Selected Fiction of Amitav Ghosh — 29
   **Dr. Poonam Mor**
8. भिण्ड जिले की ऐतिहासिक गढ़ी- मछण्ड — 34
   **डॉ. जितेन्द्र दुबे**
9. भारतीय श्रमबाजाराची वैशिष्ट्ये — 36
   **प्रा. डॉ. टी.जी. सिराळ**
10. बीड जिल्ह्यातील किशोर-किशोरींच्या व्यक्तिमत्व विकासाचा अभ्यास — 41
    **डॉ. सुनिता पटवर्धन/जोगळेकर & प्रा. ए.बी.वाळके**
11. महाराष्ट्रातील पंचायतीराज व्यवस्था - यश व अपयश — 44
    **डॉ. गोविंद यमलवाड**
12. तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट को. ऑ.क्रे. सोसायटीचा बँकिंग क्षेत्रातील कार्याचा चिकित्सक अभ्यास' — 46
    **प्रा.डॉ.साबळे बालाजी आनंदा**
13. मध्ययुगीन हिन्दी संत साहित्य और अनुसंधान की संभावनाएँ — 48
    **डॉ. संजय जाधव**
14. भारतातील वयोगटनिहाय लोकसंख्येचा अभ्यास — 52
    **प्रा.डॉ. दयानंद उजळंबे**

14.

# भारतातील वयोगटनिहाय लोकसंख्येचा अभ्यास

**प्रा.डॉ. दयानंद उजळंबे**
उपप्राचार्य, तथा भूगोल विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड. जि.परभणी.

**सारांश :**

लोकसंख्येच्या आकारात आणि रचनेत बदल घडवून आणणारे तीन महत्त्वाचे घटक आहेत. त्यात जन्मदर, मृत्यूदर आणि स्थलांतर. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर वेगवेगळ्या पंचवार्षिक योजनेमध्ये लोकसंख्या नियंत्रणासाठी विशेष प्रयत्न केले असून मृत्यूदर सुद्धा कमी करण्याचे धोरणे निश्चीत झालेले आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या १,२१,०१,९३,४२२ इतकी झाली असून उत्तरप्रदेशात सर्वाधिक लोकसंख्येची नोंद झाली आहे. लोकसंख्येच्या रचनेचा विचार करता प्रत्येक वयोगटातील लोकसंख्या भिन्न आहे. २०११ च्या जनगणनेनुसार १५ ते ५९ या वयोगटात ६५.५%, ग्रामीण ६१.०% तर शहरी ६६.६% लोकसंख्या आहे. मुबलक रोजगार उपलब्धता, कार्यकारी लोकसंख्या भारतात असल्यामुळे देशाचा आर्थिक विकास होण्यास देखील मदत झालेली आहे. प्रस्तूत शोधनिबंधामध्ये वयोगटनिहाय लोकसंख्येचा अभ्यास केला असून वयोगटानुसार लोकसंख्येच्या रचनेत कसा बदल झालेला आहे हा प्रस्तूत शोधनिबंधाचा प्रमुख उद्देश आहे.

**बीज संज्ञा-** वयोगटानुसार लोकसंख्या, वितरण, लिंग, आरोग्य, प्रशासकीय नियोजन.

**अ) प्रस्तावना :**

प्रस्तूत शोधनिबंधामध्ये भारतातील वयोगटनिहाय लोकसंख्येचा अभ्यास केला असून २०११ च्या जनगणनेनुसार आणि वयोगटनिहाय लोकसंख्या किती आहे, ग्रामीण, शहरी आणि स्त्री-पुरुष लोकसंख्येची टक्केवारी किती आहे. एकूण ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येमध्ये आणि वयोगटानुसार लोकसंख्येत कसा बदल झालेला आहे याचा अभ्यास प्रस्तूत शोधनिबंधामध्ये केला असून भारत सरकारचा विविध विभागाला जसे आरोग्य, पेन्शन, शासकीय सुविधा, शिक्षण, सेवा-सुविधा, शासकीय योजनाचे नियोजन आणि अंमलबजावणीसाठी प्रस्तूत आकडेवारीचा आणि संशोधनाचा फायदा होत असतो. सोबतच पुढील जनगणनेमध्ये कोणत्या वयोगटामध्ये लोकसंख्या वाढ आणि घट होणार आहे हे प्रस्तूत शोधनिबंधामधून निदर्शनास येते.

**ब) उद्देश :**

१. भारतातील वयोगटनिहाय, लिंगनिहाय लोकसंख्येचा अभ्यास करणे.
२. वयोगटनिहाय, लिंगनिहाय लोकसंख्येच्या अभ्यासातून शासनास योजना आखण्यास मदत करणे.

**क) क्षेत्रनिवड आणि अभ्यास पद्धती :**

प्रस्तूत संशोधनासाठी भारतातील २०११ च्या जनगणनेचा आधार घेवून आकडेवारी प्राप्त केली असून वयोगटनिहाय आणि लिंगनिहाय लोकसंख्येची रचना कशी आहे हा प्रस्तूत शोधनिबंधाचा विषय असल्यामुळे मिळालेल्या माहितीची वयोगटनिहाय आणि लिंगनिहाय विश्लेषण केले असून त्याचे पृथःकरण आलेखीय पद्धतीने केलेले आहे. प्रस्तूत आकडेवारी दुय्यम स्वरुपाची असून भारत सरकारच्या जनगणना २०११ मधून प्राप्त केली आहे.

**ड) विषय विवेचन :**

सारणी क्र. ०१ नुसार भारतात वयोगटनिहाय लोकसंख्येचा अभ्यास करत असताना दर पाच वर्ष वयोगटाची लोकसंख्या टक्केवारी मध्ये दिलेली असून सर्व वयोगटापेक्षा ० ते ५ वयोगटामध्ये सरासरी लोकसंख्या ११.५% असून ती इतर वयोगटापेक्षा सर्वाधिक आहे. त्या खालोखाल ५ ते १० वयोगटामध्ये १०.९%, १० ते १५ वयोगटामध्ये १०.६% आणि १५ ते २० वयोगटामध्ये १०.२% लोकसंख्या असून कमी लोकसंख्या असणाऱ्या वयोगटात ७५ ते ८० वयोगटात केवळ ०.७%, ८० पेक्षा जास्त वयोगटामध्ये १.०% तर ७०-७५ वयोगटामध्ये १.१% लोकसंख्या आढळते.

तर ग्रामीण लोकसंख्येचा वयोग्रटानुसार आणि लिंगनिहाय अभ्यास केला असता, ग्रामीण भागात ० ते ५ वयोगटामध्ये १२.२% लोकसंख्या आढळते जी एकूण लोकसंख्यापेक्षा सर्वाधिक असून ५-१० वयोगटात ११.७%, १० ते १५ वयोगटात ११.१% तर १५ ते २० वयोगटात १०.२% लोकसंख्या वास्तव्य करत असल्याचे प्राप्त आकडेवारीवरुन स्पष्ट होते. तर ग्रामीण भागात कमी लोकसंख्या असणाऱ्या वयोगटात ७५ ते ८० मध्ये ०.७%, ८० पेक्षा जास्त वयोगटामध्ये १% तर ७० ते ७५ वयोगटामध्ये १.१% लोकसंख्या वास्तव्य करते. जे सरासरी लोकसंख्येशी समान आहे. मात्र सरासरी लोकसंख्या आणि ग्रामीण लोकसंख्येचा अभ्यास केला असता ० ते ५, ५ ते १० आणि १० ते १५ वयोगटात ग्रामीण लोकसंख्या जास्त असून निरक्षरता, शिक्षणाचा अभाव, रहाणीमानाचा दर्जा कमी, कमी उत्पन्न, शासनाच्या योजनेची उदासीनता, अपुऱ्या रोजगाराच्या संधी, स्त्रियांना कमी सन्मान या कारणामुळे या गटातील लोकसंख्या इतर वयोगटातील लोकसंख्येपेक्षा जास्त आहे.


**सारणी क्र.१**

**भारतातील वयोगटनिहाय लोकसंख्या % मध्ये**

| वयोगट | सरासरी लोकसंख्या | | | ग्रामीण लोकसंख्या | | | शहरी लोकसंख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री |
| ०-५ | ११.५ | ११.६ | ११.३ | १२.२ | १२.४ | १२.१ | ९.७ | ९.८ | ९.६ |
| ५-१० | १०.९ | ११.० | १०.७ | ११.७ | ११.८ | ११.५ | ९.१ | ९.२ | ८.९ |
| १०-१५ | १०.६ | १०.८ | १०.४ | ११.१ | ११.३ | १०.९ | ९.४ | ९.५ | ९.२ |
| १५-२० | १०.२ | १०.५ | ९.९ | १०.२ | १०.५ | ९.४ | १०.१ | १०.३ | ९.९ |
| २०-२५ | ९.१ | ९.१ | ९.१ | ८.७ | ८.८ | ८.६ | १०.० | ९.९ | १०.१ |
| २५-३० | ८.६ | ८.४ | ८.७ | ८.२ | ८.० | ८.३ | ९.५ | ९.४ | ९.७ |
| ३०-३५ | ७.२ | ७.१ | ७.२ | ६.८ | ६.७ | ६.४ | ८.० | ७.९ | ८.१ |
| ३५-४० | ७.० | ६.९ | ७.२ | ६.८ | ६.६ | ६.९ | ७.६ | ७.५ | ७.८ |
| ४०-४५ | ५.६ | ५.६ | ५.६ | ५.३ | ५.३ | ५.३ | ६.३ | ६.३ | ६.२ |
| ४५-५० | ४.९ | ४.९ | ४.९ | ४.७ | ४.७ | ४.७ | ५.५ | ५.५ | ५.४ |
| ५०-५५ | ३.६ | ३.६ | ३.६ | ३.३ | ३.३ | ३.४ | ४.१ | ४.१ | ४.० |
| ५५-६० | ३.४ | ३.३ | ३.६ | ३.४ | ३.२ | ३.६ | ३.५ | ३.५ | ३.६ |
| ६०-६५ | २.७ | २.६ | २.८ | १.८ | २.६ | २.४ | २.६ | २.६ | २.७ |
| ६५-७० | २.० | १.९ | २.१ | २.१ | २.० | २.२ | १.८ | १.८ | १.९ |
| ७०-७५ | १.१ | १.० | १.१ | १.१ | १.० | १.१ | १.१ | १.१ | १.१ |
| ७५-८० | ०.७ | ०.६ | ०.७ | ०.७ | ०.६ | ०.७ | ०.७ | ०.६ | ०.७ |
| ८० पेक्षा जास्त | १.० | १.० | १.० | १.० | ०.१ | १.० | १.१ | १.१ | १.१ |

Source: Census of India, २०११

Graph No.1
Age Group Wise Population in India
Population in %




तर शहरी लोकसंख्येचा वयोगटानुसार आणि लिंगनिहाय प्राप्त आकडेवारीनुसार अभ्यास केला असता सरासरी लोकसंख्या आणि ग्रामीण लोकसंख्येपेक्षा लोकसंख्येमध्ये बदल झाल्याचे निदर्शनास येते. शहरी लोकसंख्येत ० ते ५ वयोगटात ९.७%, ५-१० मध्ये ९.१%, तर १० ते १५ वयोगटामध्ये ९.४% लोकसंख्या वास्तव्य करते. म्हणजेच ० ते १५ वयोगटामध्ये शहरी भागातील लोकसंख्या इतर गटाच्या तुलनेमध्ये कमी आढळते. कारण शहरी भागातील साक्षरता, राहणीमानाचा दर्जा, जन्मदर कमी करण्यासंदर्भातील प्रचार आणि प्रसार, आरोग्याच्या सुविधा उपलब्ध असल्यामुळे मृत्यूदरही कमी आढळतो. मात्र १५ ते ६० वयोगटात शहरी भागात लोकसंख्येचे

प्रमाण ग्रामीण लोकसंख्येचा वयोगट आणि सरासरी लोकसंख्येच्या वयोगटापेक्षा जास्त आहे. कारण शहरी भागात पोषण क्षमता अधिक, रोजगाराच्या संधी प्राप्त झाल्यामुळे. कार्यकारी लोकसंख्या शहरी भागात अधिक आढळते त्यामुळे शहरे झपाट्याने वाढत आहेत. ग्रामीण, आदिवासी भागातील स्थलांतराचा वेग शहरी भागाकडे जास्त आहे.

लिंगनिहाय लोकसंख्येचा अभ्यास केला असता ० ते १५ वयोगटात ग्रामीण स्त्री-पुरुष लोकसंख्या अधिक आढळते , तर १५ ते ६० वयोगटात शहरी भागात स्त्री-पुरुषाचे प्रमाण ग्रामीण लोकसंख्येपेक्षा अधिक आढळते तर ८० वर्ष वयोगटापेक्षा जास्त गटामध्ये शहरी आणि ग्रामीण आणि सरासरी लोकसंख्या समसमान आढळते. ७५-८० वयोगटात ग्रामीण भागात पुरुष लोकसंख्या ०.६%, तर स्त्री लोकसंख्या ०.७% आढळते यावरुन पुरुष मृत्यूदर जास्त आहे हे प्राप्त आकडेवारीवरुन स्पष्ट होते.

**इ) निष्कर्ष :**

१) ० ते १५ वयोगटामध्ये ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण अधिक असून स्त्री-पुरुष प्रमाणातही याच वयोगटात अधिक लोकसंख्या आढळते.

२) १५ ते ६० वर्ष वयोगटात शहरी लोकसंख्या सरासरी आणि ग्रामीण लोकसंख्येपेक्षा अधिक आढळते.

३) ७५-८० वर्ष वयोगटात ग्रामीण भागात पुरुष लोकसंख्येपेक्षा स्त्री लोकसंख्येचे प्रमाण जास्त आढळते.

४) ० ते ५ वयोगटामध्ये सरासरी लोकसंख्या १२.२% पुरुष लोकसंख्या १२.४% तर स्त्री लोकसंख्या १२.१% असून इतर वयोगटाच्या तुलनेत ती सर्वाधिक आहे पण त्याबरोबर सरासरी लोकसंख्या आणि ग्रामीण लोकसंख्या अधिक आहे. शहरी लोकसंख्येचे प्रमाण सरासरी आणि ग्रामीण लोकसंख्येपेक्षा कमी आढळते.

५) २० ते ४० वयोगटात शहरी भागात स्त्रियांचे प्रमाण अधिक असून ग्रामीण आणि सरासरी स्त्री लोकसंख्येचे प्रमाण कमी आढळते.

**ई) उपाय-योजना :**

१) ० ते १५ वयोगटात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण इतर वयोगटापेक्षा अधिक आहे. शासनाने ग्रामीण भागात साक्षरता, स्त्री-पुरुष समानता, एक कुटुंब एक मुल योजनेचा प्रचार, स्त्रियांना न्याय, अल्पवयीन लग्न प्रथा बंद करुन स्त्रियांना मोफत शिक्षण आणि आहार आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

२) १५ ते ६० वर्ष वयोगटात शहरी भागात लोकसंख्येचे प्रमाण अधिक असल्यामुळे शहरी लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेवून रस्ते, वसाहती, आरोग्याच्या, शिक्षणाच्या सुविधेमध्ये वाढ करणे गरजेचे असून उद्योगवाढीसाठी प्रोत्साहन मिळण्यासाठी शासनाच्या वेगवेगळ्या योजनाची उदा. स्टार्टपची अंमलबजावणी होणे अपेक्षित असून कमी व्याजदराने भांडवल उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. तसेच शहरी भागात विशेषतः २० ते ४० वयोगटात महिलांचे प्रमाण जास्त असल्यामुळे महिलांच्या सुरक्षितता, रोजगार आणि सन्मानासंदर्भात विविध योजना कार्यान्वित करणे गरजेचे आहे.

३) ७५-८० वर्ष वयोगटात शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. पुरुष मृत्यूदर ग्रामीण भागात या वयोगटात अधिक असल्यामुळे ७५-८० वर्ष वयोगटापेक्षा सर्वच स्त्रियांना सन्मान पेन्शन योजना कार्यान्वित करणे गरजेचे आहे.

४) २०११ च्या जनगणनेनुसार ० ते १५ वयोगटात स्त्री-पुरुष लोकसंख्या इतर वयोगटाच्या तुलनेत अधिक असल्यामुळे भविष्यात लोकसंख्या वाढीचा दर अधिक राहणार असल्यामुळे लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना, आणि अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे.

५) २०११ च्या जनगणनेनुसार ० ते ५ वयोगटात ग्रामीण लोकसंख्या १२.४%, सरासरी लोकसंख्या ११.५% तर शहरी लोकसंख्या ९.७% असून ग्रामीण भागात लोकसंख्या वाढीचा वेग वाढतोय हे वेळीच ध्यानात घेऊन लोकसंख्या नियंत्रणाबाबत ठोस धोरण ठरविणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**


१. www.https://censusindia.gov.in
२. www.https://indiastat.com
३. www.https://en.m.wikipedia
४. www.https://mhrd.gov.in
५. www.https://data.gov.in
६. www.https://muspi.nic.in


□□□